झाले आणि सर्व शिबीरार्थींना एकेक प्रत सप्रेम भेट देण्यात आले.

‘‘गुरु-शिष्य योग’ या विषयावर बोलताना स्वामी धर्मनिष्ठानंद (दिव्य जीवन संघ, ऋषिकेश) म्हणाले -

- दिव्य सत्ता गुरुची असते, पण ती आपल्या मानसिक स्तरावर अस्तित्वात असते, जेंव्हा आपणांस ‘अवतार’ पाहायला मिळतो, तेव्हा आपण गुरु हे तत्त्व स्वीकरतो.
- गुरुच्या आश्रयाला गेलो की सर्व दुःखनिवृत्ती आणि परमानंद प्राप्ती या स्थितीला आपण पोहोचतो.
- शिक्षक दैनंदिन विषयांवर माहिती देतो आणि त्याची भूमिका मर्यादित असते. पुराणात गुरुकूल या संकल्पनेत आचार्यांना मानाचे स्थान होते. एकत्र राहण्यामुळे ते आपल्या शिष्यांसमोर आदर्श उभा करू शकत. गुरुसाठी मात्र आपल्याला साधना करावी लागते.
- गुरुप्रती आदरापेक्षा गुरु आदेशांचे पालन अधिक महत्त्वाचे असते.
- दृष्टी दिक्षा, स्पर्श दिक्षा, कर्म दिक्षा, संकल्प दिक्षा अशा माध्यमांतून गुरु ज्ञान देत असतो.
- भगवत गीतेतील जोडी म्हणजे प्रयास रुपी अर्जून आणि ज्ञानरुपी कृष्ण अशी आहे. गुरु सर्वत्र असतो आणि त्याचे अधिष्ठान शिष्यात असते.
- गुरु शाश्वत, असीमित असतो.



## दिव्य जीवन संघ, पुणे शाखा वृत्तांत

- जून महिन्याचा सत्संग दि. १२ रोजी दुपारी श्री. नितिन देशपांडे यांचे घरी संपन्न झाला.
- ‘दिव्य जीवन’ या मासिक पत्रिकेचा जून अंक परिवारातील सदस्यांना वितरित करण्यात आला.
- शाखेच्या सदस्या गायत्री सेवक यांनी शाखेला ₹ ४५० देणगी दिली.


**पुणे शाखेचा पत्ता**

**श्री. गो. आ. नगरकर**
‘स्वानंद’ एस्. २०
सहजीवन सोसायटी
पर्वती, पुणे ४११००९
९३७०५७०२०६

**श्री. नितीन देशपांडे**
‘ईशावास्य’
प्लॉट नं. ४९ /सायंतारा,
डी. एस. के. विश्व
धायरी, पुणे ४११०४१
०९८५०९३१४१७
०९८५०८२६९९०


पुस्त डाक

प्रति



# दिव्य जीवन






(दिव्य जीवन संघ, पुणे शाखा)
(ज्ञानयज्ञ म्हणून वितरित)
वर्ष ११ । अंक ७
जुलै २०१६


स्वामी शिवानंद सरस्वती

स्वामी चिदानंद सरस्वती

## स्वामी शिवानंद स्मृती व्याख्यान

दरवर्षीप्रमाणे यंदाही स्वामी शिवानंद स्मृती व्याख्यानाचे दि. १४ जुलै २०१६ रोजी सायंकाळी ६ ते ८ या वेळेत गीताधर्म मंडळ, सदाशिव पेठ, पुणे येथे आयोजन करण्यात आलेले आहे. यावेळी वक्त्या आहेत. ‘मनिषा बाठे !’ अनेक भारतीय भाषा आणि लिप्यांवर त्यांचे प्रभुत्व आहे. तरी सर्वांनी या व्याख्यानाचा जरुर लाभ घ्यावा.

तसेच १९ जुलै रोजी गुरुपौर्णिमे निमित्त श्री. नगरकर यांचे घरी गुरु पादुका पूजन आणि प्रसाद वाटपाचे आयोजन करण्यात आलेले आहे. त्याचाही परिवारातील सदस्यांनी लाभ घ्यावा ही विनंती.

## महिन्याचा विचार

वडोदरा येथील आध्यात्मिक परिषदेचे वृत्तांकन

३० मे २०१६ रोजी दुपारच्या सत्रात असंगानंदजी महाराज यांचे ‘साधना - एक अंतर्यात्रा’ या विषयावर प्रवचन झाले. ते स्वामी सत्यानंदांचे शिष्य आहेत. त्यांनी मांडलेले काही विचार -

- कलियुगातील स्थितप्रज्ञाचे उदाहरण एकमेव आहे आणि ते म्हणजे स्वामी चिदानंद सरस्वती !
- उपनिषदात असा उल्लेख आहे की -
  आत्मा रथी (मालिक) है, शरीर रथ है।
  बुद्धी सरथी हैं, मन लगाम है।
  और इंद्रिय घोडे है, जो बाहर देखते हैं।
  यात्रा कभी सकुशल नही होती। छांदोग्यपनिषद म्हणते-
  ‘‘एक ही चीज सुखभी देती है और दुखभी देती हैं।’’
- मूल (ज़डे) कहाँ है - इसका उत्तर अंदर है, इसलिए अंदरकी यात्रा शुरु होती है।
- तीर्थयात्रा बाहर की ओर, लेकीन साधना अंदर की ओर, चेतना की ओर होती है।
  यानंतर डॉ. जे. के. भट यांनी ‘भागवतातील १० व्या स्कंधातील भक्तिचे स्वरूप’ या विषयावर विचार मांडले. ते म्हणाले -
- वेद आणि उपनिषदांचे सार म्हणजे भागवत.
- ऋषींना परमात्म्याचे दर्शन/अनुभूती होते आणि त्यानंतर मंत्र स्फुरतात. त्यामुळे ते मंत्रद्रष्टा (मंत्रकर्ता नव्हे) असतात.
- बाराव्या स्कंधात वैष्णव शब्दाचा अर्थ ‘सतत अनुसंधान’ असा दिलेला आहे. अकरावा स्कंध मुक्ती/मोक्षाचे (स्वस्वरूपात विलीन होणे) वर्णन करतो.
- उपासनेचे अंतिम रुपांतर भक्तीत होते.
- भागवतात तीन प्रकारची दर्शने मांडलेली आहेत -
  कनिष्ठ - फक्त मूर्तीत परमात्मा दर्शन
  मध्यम - फक्त स्वजनात / मनात परमात्मा दर्शन
  उत्तम - स्वजन + प्राणिमात्रात परमात्मा दर्शन
- जे जे सर्वोत्तम ते ते गीता !
- भागवतात १०५० श्लोकांमध्ये भक्तीवर भाष्य केलेले आहे.
- भागवतातील २४ अध्यायांमध्ये कृष्ण-उद्धवात संवाद आहे.
- भक्तीचे तीन प्रकार येथे सांगितले आहेत -
  साधन - भक्ती (साधन शुद्ध असावे)
  विधी - भक्ती (भजन, अर्चन, वंदन, ग्रंथवाचन)
  परा - भक्ती (सर्वश्रेष्ठ, साध्यावर लक्ष्य केंद्रित करणे)

३१ मे २०१६ रोजी, दुसऱ्या दिवशी पहिल्या सत्रात डॉ. जयेश त्रिपाठी यांचे ‘निरामय जीवनशैली’ (Healthy Lifestyle) या विषयावर व्याख्यान झाले.

त्यांनी स्वास्थ्य तपासण्यासाठी स्वमूल्यांकनावर भर दिला.

आरोग्यात, शारिरीक, मानसिक, आर्थिक आणि आध्यात्मिक स्वास्थ समाविष्ट असते. त्यांच्या मते आपला उपवास प्रायः Ritualistic असतो. आणि Spiritualistic नसतो. रोज आपण व्यायामासाठी किमान वेळ देतो कां ? ४० मिनिटे चालणे आणि योगासने करणे खरंतर आवश्यक असते. शरीर स्वस्थ असणे हीच जीवनशैली असते. प्रत्येक व्यायामाअगोदर वॉर्म अपचे महत्त्व त्यांनी विषद केले.

विश्रांती घेताना, नाडीकडे/हृदयाच्या ठोक्यांकडे अधिक काळजीपूर्वक लक्ष द्यायला हवे. अगदी डॉक्टरांनाही १०० % मानवी शरीराचे ज्ञान झालेले नसते.

बेकरी उत्पादने, चीज, फरसाण, पापड असे पदार्थ आयुष्यातून वर्ज्य करायला हवेत. त्याचबरोबर व्यसन मुक्तीही तितकीच महत्त्वाची असल्याचे त्यांनी प्रतिपादन केले. नियमित चेकअपवर भर देत त्यांनी शेवटी काही साधकांच्या शंकांचे निरसनही केले.

त्यानंतर नडियादच्या स्वामिजींचे ‘भक्ती तत्त्व मीमांसे’ वर प्रवचन झाले. त्यांचे काही महत्त्वाचे विचार -

- मानवी जीवनाचा हेतू - स्वरूप प्राप्ती (परमात्मा प्राप्ती)
- Prayer is not eight hours job.
- भक्तीमध्ये भगवंत आपला निद्रस्त सहकारी असतो. तो आपल्या कर्मेंद्रियांना/ज्ञानेंद्रियांना पतपुरवठा करीत असतो.
- More Ishwara in me, less 'me' (ego) in me !!! Then there is least problem.
- ऋषीमुनी दोन बाबींमध्ये अत्यंत स्पष्ट होते -
  View of life (दृष्टीकोन)
  आणि
  Way of life (जीवनाचा हेतू)
- भक्ताने रोज सकाळी पूजारूपी कर्म करावे आणि नंतर दिवसभर कर्मरुपी पूजा करावी.
- आपला विचार/आचार/ व्यवहारातून भगवंत प्रसन्न व्हायला हवा.

यानंतरच्या सत्रात ‘शत शत वंदना’ (ज्ञाननिधी, Compendeun of Wisdom) या स्मरणिकेचे प्रकाशन